
e Paper
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
वर्ष 4थे
www.metrocityvrutant.in | रविवार दिनांक 23/11/२०२५ | METRO CITY VRUTANT
संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 274 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com




'सनी संस्कार की तुलसी कुमारी' चित्रपट आता ओटीटीवर

# 'स्वबळ' की 'युती'? भाजपचे स्पष्टीकरण !

## कोअर कमिटी ठरवणार ; प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची स्पष्टोक्ती



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड: पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची आगामी निवडणूक भारतीय जनता पक्षाने एकट्याने लढायची की युती करून, याचा निर्णय स्थानिक परिस्थिती पाहून शहर भाजपची कोअर कमिटी घेईल, आणि त्यानंतर वरिष्ठ पातळीवर अंतिम निर्णय घेतला जाईल, असे मोठे विधान भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. शनिवारी, चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात पिंपरी-चिंचवड शहर भाजपचा कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.**

यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अध्यक्षतेत व प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, पश्चिम महाराष्ट्र विभागीय संघटन मंत्री मकरंद देशपांडे, आमदार महेश लांडगे, निवडणूक प्रमुख आमदार शंकर जगताप, पिंपरी चिंचवड निवडणूक संचालन समितीचे संयोजक आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप, संघठन सरचिटणीस ॲड.मोरेश्वर शेडगे,विकास डोळस, वैशाली खाडेय,मधुकर बच्चे,यांसह माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, उषा ढोरे, प्रदेश सदस्य सदाशिव खाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षाचे सर्व नगरसेवक-नगरसेविका, हजारो पदाधिकारी व महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

प्रसंगी, बजरंग दलाचे विभाग पुणे विभाग संयोजक कुणाल साठे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (राकांपा) माजी नगरसेवक अरुण टाक, श्रीमती आशाताई सोदाई, मावळ तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष हेमंत राऊत, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे युवा नेते जगदीश येवले, प्रभाग क्रमांक १७ चिंचवडे नगर येथील धनंजय आंबुसकर, संत तुकाराम नगर प्रभागातील डॉ. संदीप बागडे, प्रभाग क्रमांक १४ संतोष चौगुले, पिंपळे सौदागर येथील प्रसिद्ध उद्योजक संदीप काटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. तसेच यावेळी महिला मोर्चा, युवा मोर्चा, ओबीसी मोर्चा, कायदा आघाडी, शहरातील सर्व मंडले व विविध आघाडीच्या कार्यकारिणीची घोषित करण्यात आली.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, "भाजपचे कार्यकर्ते वैचारिक भूमिका घट्ट धरून आहेत आणि ते पक्षाचा राष्ट्रवादी मोठा पक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे भारताची ओळख जगभर पोहोचली आहे. फक्त भाजप हाच पक्ष देशाच्या हिताचा विचार करणारा अजेंडा घेऊन चालतो. बाकीच्या प्रादेशिक पक्षांचा अजेंडा हा कुटुंबावर आधारित असतो. आपला अजेंडा देश आणि देशाच्या फायद्यासाठी आहे."त्यांनी कार्यकर्त्यांना 'बूथ'वर ५१ टक्के मतांची लढाई लढण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले आणि 'भारत माता की जय, वंदे मातरम' चा मंत्र प्रत्येकाच्या मनात पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यास सांगितले.

### 'शंभर पार'चा नारा आणि स्थानिक नेत्यांचा आग्रह

प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी सांगितले, "शहरात भाजपला मोठी ताकद मिळाली आहे. मनपा निवडणुकीत १०० पेक्षा जास्त नगरसेवक निवडून येतील आणि पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचाच महापौर होईल. त्यासाठी मतदारांपर्यंत पोहोचून पदवीधर मतदार नोंदणी वाढवावी."शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी 'शंभर पार'चा नारा दिला व महानगरपालिका निवडणूक जिंकण्याचा संकल्प सोडला आणि शहराच्या विकासासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री यांनी जास्तीत जास्त अशी मागणी यावेळी त्यांनी केली.हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या भव्य कार्यकर्ता मेळाव्याचे प्रास्ताविक शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केले तर सूत्रसंचालन संगठन सरचिटणीस ॲड.मोरेश्वर शेडगे यांनी केले.

# मतदार यादीत घोळ ; राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आक्रमक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनातील गंभीर त्रुटी व गोंधळ दूर करून, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केली आहे. अनेक प्रभागांत ५ हजार पेक्षा जास्त मतदारांचा घोळ झाला असून अनेक मतदारांचे नाव हे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात गेले, तसेच मतदार यादीत दुबार मतदार वाढ झाली असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नाराजी व्यक्त केली आहे.**



पिंपरी चिंचवड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पत्रकार परिषद घेत नाराजी व्यक्त केली आहे. या पत्रकार परिषदेत शहर समन्वयक विलास लांडे, शहराध्यक्ष योगेश बहल, पक्ष प्रवक्ते अजित गव्हाणे, मंगलाताई कदम, भाऊसाहेब भोईर, कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे, फजल शेख, उल्हास शेट्टी, भोसरी विधानसभा अध्यक्ष पंकज भालेकर, श्रीधर वाल्हेकर, विनायक रणसुभे आधी उपस्थित होते.

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केलेल्या प्रमुख मागण्या -**

१.मतदाराला आपले नाव ऑनलाईन / ॲपवर त्याच्या नाव, पत्ता किंवा मतदान ओळखपत्र क्रमांकावरून त्वरित शोधता येईल, अशी युजर-फ्रेंडली सर्च सुविधा तातडीने उपलब्ध करून द्यावी.

२.वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या P D F मतदार याद्यांमध्ये 'सर्च' (Search) करण्याची सुविधा त्वरित अंतर्भूत करावी, जेणेकरून मतदारांना मॅन्युअल शोधण्याची गैरसोय टाळता येईल.

३.मोठ्या प्रमाणात झालेल्या चुकीच्या विभाजनावर, विशेषतः पूर्ण यादी भाग किंवा वस्ती चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याच्या ठिकाणी, स्थळ पाहणी करून suo-moto (स्वतःहून) दुरुस्ती करण्याची कार्यवाही प्राधिकृत अधिकाऱ्यांमार्फत तातडीने सुरू करावी.

४.प्रभाग स्तरावर मतदारांना त्यांचे नाव व प्रभाग शोधण्यासाठी विशेष सहायता केंद्रे (Help Centers) त्वरित उपलब्ध करून द्यावीत.

५.प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करताना आयोगाच्या आदेशातील परिच्छेद २ नुसार, केवळ सेक्शन ॲड्रेस नव्हे, तर प्रत्यक्ष भौगोलिक स्थान तपासून केलेल्या दुरुस्त्या अंतिम यादीत समाविष्ट केल्याची खात्री करावी.

६.प्रारूप मतदारयाद्यांमध्ये मोठ्याप्रमाणात घोळ झाले असल्याने सदर प्रारूप याद्यांबाबत हरकती सूचना दाखल करण्यासाठी देण्यात आलेली मुदत ही वाढविण्यात यावी.

७.प्रारूप मतदारयाद्यांबाबत हरकती / सूचना दाखल करण्यासाठी ऑनलाईन सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात यावी.

८. दुबार / तिबार मतदारांबाबत आपल्या मार्फत देण्यात आलेल्या आदेशाचे काटेकोरपणे व तातडीने पालन करण्यासाठी एक स्वतंत्र कक्ष स्ताप्र करून त्याबाबतच्या कार्यवाही बद्दलचे स्थिती सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध करून द्यावी.

९.मतदारयाद्यांमधील त्रुटी मान्यता प्राप्त राजकीय पक्षांच्या मार्फत लाक्षात आणून दिल्या त्याबाबतची सखोल चौकशी करून दुरुस्ती करण्याची मुभा महानगरपालिका आयुक्तांना द्यावी जेणेकरून सामान्य मतदारांना होणारा मनस्ताप टाळता येईल.

# मुलधारा हेरिटेज क्लबची चिंचवड गावात हेरिटेज वॉक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाइन मधील "मुलधारा हेरिटेज क्लब" च्या सर्व विद्यार्थी सभासदांनी चिंचवड गाव आणि परिसरात हेरिटेज वॉकचे आयोजन केले होते.**



प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. पिंपरी चिंचवड शहराचा धार्मिक आणि आध्यात्मिक वारसा असणारे मोरया गोसावी मंदिर, राम मंदिर, मंगलमुर्ती वाडा, क्रांतिवीर चापेकर वाडा येथे भेट देऊन त्याचे सांस्कृतिक आणि वास्तुशिल्पीय महत्व समजून घेतले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन मधील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवले जातात. त्या अंतर्गत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ऐतिहासिक वारसा स्थळांना भेट देणे, त्यांची माहिती घेणे, वास्तुशिल्पीय महत्त्व समजून घेणे असे उपक्रम "मुलधारा हेरिटेज क्लब" च्या माध्यमातून राबविले जातात.

यामुळे परिसराच्या ऐतिहासिक सांस्कृतिक वारशाची, आणि तत्कालीन काळातील वास्तुरचनेची माहिती मिळते. या वारसा अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी स्केचिंग सत्र राबविले. यामुळे स्थळांचे निरीक्षण करणे, नोंद वही ठेवणे आणि पर्यावरण पूरक संवेदनशीलतेने वास्तु उभारणे असे अनुभव विद्यार्थ्यांना मिळाले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्मिता सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली क्लबच्या अध्यक्ष जान्हवी भोसले, उपाध्यक्ष दिशा प्रधान, सचिव श्वेता शिंदे, खजिनदार मानव कोतफोडे, सदस्य सुकन्या गवडे, प्राची देशपांडे आणि समृद्धा कदम व मार्गदर्शक आर्किटेक्ट अभिषेक रांका यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी मुलधारा हेरिटेज क्लबचे कौतुक केले.

# मतदार यादीवर प्राप्त होणा-या सूचनांची गांभिर्याने दखल घ्या

## आयुक्त श्रावण हर्डीकर यांचे निर्देश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रारुप मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ठ होणा-या संबंधित विधानसभा क्षेत्रांच्या दिनांक १ जुलै २०२५ अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीवरुन महानगरपालिकेची प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी गुरुवारी २० नोव्हेंबर २०२५ रोजी मतदार यादी कक्ष तसेच आठ क्षेत्रीय कार्यालयात आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.**



या प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना स्विकारण्यासाठी २७ नोव्हेंबर पर्यंत मुदत देण्यात आली आहे. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती सूचना आणि आक्षेपांची गांभिर्याने दखल घ्यावी असे निर्देश निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले आहे.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आज आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार यांच्यासह स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत शिंपी, उप आयुक्त पंकज पाटील, डॉ. प्रदिप ठेंगल, संदिप खोत, सिताराम बहुरे, चेतना केरुरे, सर्व क्षेत्रीय अधिकारी तसेच प्रारुप मतदार यादी हरकत व सूचना कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.प्रारुप मतदार यादीवर हरकती आणि सूचना तसेच आक्षेप घेण्यासाठी नागरिक येत आहेत. या हरकतींची संबंधीत क्षेत्रीय अधिका-यांनी स्वत: तपासणी करुन पडताळणी करावी. तसेच या हरकतींवर निर्णय घेण्यासाठी आठ क्षेत्रीय कार्यालयाकरीता स्वतंत्रपणे एक उप आयुक्त नियुक्त करण्यात आला आहे. त्यांनी मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा निपटारा करावा. तसेच हरकत दाखल करण्यासाठी आलेल्या नागरिक तसेच पदाधिका-यांचे म्हणणे व्यवस्थितपणे ऐकून घ्यावे. संवेदनशीलतेने सर्व प्रक्रिया हाताळताना राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले.सदर प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादीच्या प्रती महापालिकेच्या मतदार यादी कक्ष विभागात छापील (हार्ड कॉपी) स्वरुपात नागरिकांना पाहण्यासाठी व विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रारुप मतदार यादी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथील मतदार यादी कक्ष व मनपाच्या आठही क्षेत्रीय कार्यालय तसेच मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. मतदार यादीतील त्यांचे नांव कोणत्या प्रभागात आहे तसेच विधानसभेचा नंबर, भाग यादी क्रमांक व अनुक्रमांक हे शोधण्यासाठी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी दिलेली लिंक देखील महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नांव शोधण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने https://mahasecvoterlist.in हे नविन संकेत स्थळ विकसित केले असून यावरुन देखील मतदारांचे नांव शोधता येणार आहे.सदर संकेत स्थळावरुन मतदारांना मतदार यादीतील नांवावरुन व मतदार ओळखपत्रावरील इपिक नंबरचा वापर करुन त्यांचे नांव कोणत्या प्रभागात आहे हे शोधणे अधिक सुलभ, सोपे आहे. यासाठी सर्व मतदारांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वरील संकेत स्थळाचा मतदार यादीतील नांव शोधण्याकरीता वापर करावा असे आवाहन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले

# गोव्यातील मद्याची तस्करी ; 30 लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : गोव्यातील विदेशी मद्याची तस्करी करणाऱ्या आठ जणांना राज्य उत्पादन शुल्क विभागाने अटक केली. सिंहगड रस्त्यावरील धायरी, तसेच नऱ्हे परिसरात ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी विदेशी मद्याच्या बाटल्यांसह ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला.उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने सिंहगड रस्त्यावरील धायरी फाटा परिसरात नुकतीच कारवाई केली. मोटारीतून




गोव्यातील मद्याच्या बाटल्या विक्रीस नेण्यात येत असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागच्या पथकाला (डी विभाग) मिळाली. त्यानंतर पथकाने दोन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत मद्याच्या बाटल्या, मोटार, मोबाइल संच असा २९ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.याप्रकरणी अमर पुंडलिक बोडरे (रा. पिंपळवाडी, फलटण, जि. सातारा), चेतन मधुकर बाटे, शुभम राजेंद्र भुसारे, उवेजरजा शकील तांबोळी (तिघेही रा. नऱ्हे, पुणे) तुषार सुभाष काळाने (रा. धालेवाडी, पुरंदर) यांना अटक करण्यात आली.

त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा, तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नऱ्हे-धायरी रस्त्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने आणखी एक कारवाई केली. या कारवाईत मद्याच्या बाटल्या, तसेच मोटार जप्त करण्यात आली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक सचिन श्रीवास्तव, दुय्यम निरीक्षक रोहित माने, थोरात, हितेश पवार, सहायक दुय्यम निरीक्षक सागर धुर्वे, जवान ठुबे, आबनावे, साळुंखे, तात्या शिंदे यांनी ही कारवाई केली. पुढील तपास निरीक्षक श्रीवास्तव करीत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 23/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# ‘सनी संस्कार की तुलसी कुमारी’ चित्रपट आता ओटीटीवर


दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वरुण धवन आणि जान्हवी कपूर यांचा ‘सनी संस्कार की तुलसी कुमारी’ हा चित्रपट २ ऑक्टोबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर फार चांगला प्रतिसाद मिळाला नाही. साधारणपणे निर्माते अडीच ते तीन महिन्यांनी चित्रपट ओटीटीवर रिलीज करतात. पण वरुण आणि जान्हवीचा हा रोमँटिक चित्रपट लवकरच ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे.

शशांक खेतान दिग्दर्शित हा रोमँटिक चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आदळला होता. आता चित्रपट ओटीटी रिलीजमुळे चर्चेत आला आहे. बरेच चित्रपट थिएटरमध्ये फ्लॉप ठरतात, पण ओटीटीवर प्रेक्षकांकडून त्यांना चांगला प्रतिसाद मिळतो.

‘सनी संस्कार की तुलसी कुमारी’ चित्रपटाच्या निर्मात्यांनाही अशीच अपेक्षा असेल. ओटीटी रिलीजनंतर हा चित्रपट कशी कामगिरी करतो हे पाहणे महत्त्वाचं ठरेल.

वरुण धवन आणि जान्हवी कपूरचा सनी संस्कारी की तुलसी कुमारी हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. हा रोमँटिक कॉमेडी चित्रपट २७ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. तुमच्याकडे नेटफ्लिक्सचे सबस्क्रिप्शन असेल तर तुम्ही तो घरबसल्या पाहू शकता.




# एस. बी. पाटील च्या 21 खेळाडूंची कुराश स्पर्धेसाठी निवड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे जिल्हा परिषद यांच्या वतीने जिल्हास्तरीय शालेय कुराश स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) च्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत २१ सुवर्ण आणि १५ रौप्य पदकांची कमाई केली. सुवर्णपदक पटकावणारे २१ खेळाडूंची विभागीय कुराश स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**



एस. बी. पाटील पब्लिक स्कूल, रावेत येथे झालेल्या या जिल्हास्तरीय शालेय कुराश स्पर्धेत सुवर्णपदक मिळवलेले खेळाडू खालील प्रमाणे -

१४ वर्षे वयोगट - मधुरेश जावळे, राजवीर अजुरे, आदित्य खाडे, निरंजन भोंडवे, वैदेही निकम, पूर्वी गायकवाड;

१७ वर्षे वयोगट - यश भोंडवे, मानस तरस, ओम पाटील, आदित्य खत्री, दिया जैन, वेदश्री भंगाळे, दूर्वा वाजे, वैष्णवी पाटील;

१९ वर्षे वयोगट - सुयोग सोनवणे, यश गायकवाड, दिविज पटेल, गौरंग वाघमारे, सई थोरात, शर्वरी भोंडवे, अल्फिया शेख यांनी सुवर्णपदक पटकाविले यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

रौप्य पदक पटकावणारे खेळाडू पुढील प्रमाणे १४ वर्षे वयोगट - तनिश भोंडवे, अंकुर वाजे, आयुष शिंगी, स्वरांजली कुलकर्णी, ध्वनी चऱ्हाटे, अनुश्री पालखे, १७ वर्षे वयोगट - आर्यन तुपे, माहीन शेट्टी, यश गायकवाड, श्रेया ढोरे, अन्वयी बिडवे, मृण्मयी पाटील, १९ वर्षे वयोगट - वंश सक्सेना, आयुष राजपूत, इशिता हर्णे; १७ वर्षे वयोगटात आराध्या जाधव हिने कांस्य पदक मिळविले.

प्राचार्य डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्य पद्मावती बंडा, क्रीडा शिक्षक धनाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
रविवार दिनांक 23/11/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper




अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734